MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

## एक दिवस संसार टिकला, नागपूरच्या युवकाला पत्नीला ५० लाखांची पोटगी द्यावी लागली, न्यायमूर्तींनी सर्वोच्च न्यायालयात किस्सा सांगितला

नवी दिल्ली : विवाहित महिलांचं शोषण होऊ नये म्हणून भारतात हुंडा प्रथेविरोधात आणि घरगुती हिंसाचाराची प्रकरणं रोखण्यासाठी कायदा करण्यात आलेला आहे. भारतीय दंड संहितेचे कलम ४९८-अ म्हणजे घरगुती हिंसाचार कायदा याच्या वापराबद्दल अनेकदा चर्चा होत असते. या कायद्याचा गैरवापर होत असल्याची काही उदाहरणं देखील समोर आली आहेत. सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती बीआर गवई, न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्र, न्यायमूर्ती केवी विश्वनाथन यांच्या पीठासमोर एका कौटुंबिक प्रकरणाची सुनावणी सुरु होती. न्यायमूर्ती बीआर गवई यांनी पोटगी संदर्भात एक प्रकरण सर्वोच्च न्यायालयासमोर मांडलं. ते म्हणाले अशा प्रकरणांमध्ये स्वातंत्र्य मिळणं महत्त्वाचं असतं.




बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -३५० | बुधवार दि.११ सप्टेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -350 | WEDNESDAY DT.11 SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# लक्ष्मीपूजनाच्या अर्धातास अगोदर लक्ष्मीचा मृत्यू

# डॉ.बडेंच्या गलथान कारभार चव्हाट्यावर

- सबंधित डॉ भोपाळेसह अन्य कर्मचारीवर निलंबनाची कारवाई करावी – अजिंक्य चांदणे
- डॉ अशोक बडे सिव्हिल सर्जन नावापुरतेच
- बीड जिल्हा रुग्णालयातील अनेक वार्डात उपचार उपलब्ध नाहीत
- चार वाजून नऊ मिनिटानी कॉल दिला तरी डॉ हजर नाहीत झाले
- डॉ भोपळेने तीन वाजता राऊड घेतला काय उपचार नाहीत नातेवाईकांचा ठिय्या
- सिव्हिल सर्जन डॉ अशोक बडेच्या कॅबिन मध्ये राडा
- डॉ अशोक बडेचा  हलगर्जीपणा पुन्हा चव्हाट्यावर
- जिल्हा रुग्णालयात वेळेवर डॉक्टरांची उपस्थिती नसते

बीड जिल्हा रुग्णालयामध्ये सकाळी औषध प्रशासन केलेली महिला ऍडमिट झाली होती परंतु त्या ठिकाणी संबंधित महिलेला औषध प्राशन केल्यानंतर जिल्हा रुग्णालयातील इमर्जन्सी वाढ मध्ये ऍडमिट केल्यानंतर सक्षम करणे गरजेचे आहे परंतु संबंधित महिलेला सक्षम न केल्यामुळे डॉक्टरांचा हलकर्जीपणा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे डॉक्टर अशोक बडे शिव सर्जन हे फक्त नावापुरतेच आहेत तर त्यांचा कारभार अन्य डॉक्टर पाहत आहेत यावेळी डॉक्टर अशोक बडे यांच्या कारकिर्दीवर संशयाची सुई येत असून त्या ठिकाणी शंभर टक्के डॉक्टर बडे हे जिल्हा रुग्णालयाची जबाबदारी आहे.

बीड ( प्रतिनिधी) विष घेतलेल्या एका एका महिलेस बीड जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.त्या महिलेचा डॉक्टरांच्यानिष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्याचां आरोप नातेवाईकानी करत मृतदेह थेट बीड जिल्हा शल्य चिकित्सक अशोक बडे यांच्या केबिनमध्ये ठेवण्यात आला.आज दिनाक ११ सप्टेंबर रोजी सकाळी उंदीर मारण्याच्या गोळ्या खाल्याने त्यांना त्रास होऊ लागल्याने आज सकाळी उपचारासाठी बीड शासकीय रुग्णालयात कुटुंबातील लोकांनी दाखल करण्यात आले होते.रेखा विपुल गायकवाड वय ३४ वर्ष रा. काळा हनुमान ठाणा चांदणे वस्ती बीड महिलेचा डॉक्टरचे निष्काजीपणनेमृ मृत्यू झाल्याने वेळी शेकडो नातेवाईक व कार्यकर्ते बडे यांच्या केबिनमध्ये ठाण मांडून बसले होते. या घटनेतील संबंधित सर्व दोशीवर सदोष मनुष्यबदाचा गुन्हा तसेच कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी नातेवाईकांनी यावेळी केली.तसेच संबंधित डॉक्टर वर सदोषमनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा असे लेखी आश्वासन दिल्यावरच मृतदेह शविच्छेदनासाठी नेण्यात आला.





# धनंजय मुंडे यांच्या सामाजिक व विकासात्मक कार्याचे खा. हेमामालिनींकडून कौतुक

## हेमामालिनी यांच्या प्रमुख भूमिकेतील राधा रासबिहारी या संगीत नाट्याने परळीकरांना घातली भुरळ

**परळी वैद्यनाथ  – महाराष्ट्राचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून सामाजिक व सांस्कृतिक चळवळ जोपासली आहे. त्यांच्या माध्यमातून परळीकरांना एकापेक्षा एक सरस सांस्कृतिक कार्यक्रम पाहायला मिळतात, तसेच नाथ प्रतिष्ठान इथल्या जनतेच्या सुखदु:खात देखील बरोबरीने साथ देते. धनंजय मुंडे हे इथले आमदार व मंत्री म्हणून देखील कायम जनतेच्या सेवेत व विकासाच्या कार्यात मग्न असतात असे म्हणत ड्रीम गर्ल म्हणून अख्ख्या देशात प्रसिद्ध असलेल्या ज्येष्ठ सिने अभिनेत्री खा.हेमामालिनी यांनी धनंजय मुंडे यांचे परळी येथील वैद्यनाथ गणेश महोत्सवात भरभरून कौतुक केले आहे.**

**परळी येथे ना धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून व ज्येष्ठ नेते वाल्मीक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या सुरू असलेल्या श्री वैद्यनाथ गणेश महोत्सवात हेमा मालिनी यांच्या प्रमुख भूमिकेतील 'राधा रासबिहारी' या संगीत नाट्याचे आयोजन करण्यात आले होते.**

या नाटिकेमध्ये वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या हेमामालिनी यांनी साकारलेल्या राधेने आणि सोबतच श्रीकृष्ण व गोपिकांची रासलीला तसेच सुदामापासून कंसापर्यंतच्या विविध साकारलेल्या भूमिका आदींनी परळीकरांना अक्षरशः भुरळ घातली. विविध वेशभूषा साकारलेल्या सुमारे ५० कलाकारांचे दिग्दर्शन व निर्मिती



स्वतः हेमा मालिनी यांनी केले होते त्याचबरोबर प्रत्येक कलाकाराच्या मेकअप पासून ते वेशभूषेपर्यंत सर्वांची तपासणी सुद्धा त्या स्वतः करत होत्या. या वयात कलेप्रती त्यांचा उत्साह पाहून नवोदित कलाकारांना नक्कीच प्रेरणा मिळेल. अभिनेत्री तथा खासदार हेमामालिनी यांचे नाथ प्रतिष्ठानच्या वतीने सौ राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी स्वागत केले त्याचबरोबर नात प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांच्या मार्फत आलेल्या सर्व कलाकारांचे यथोचित स्वागत यावेळी करण्यात आले.ना.धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान द्वारे आयोजित श्री वैद्यनाथ गणेश महोत्सव अंतर्गत आज आयोजित प्रसिद्ध अभिनेत्री तथा लोकसभा खासदार हेमामालिनी यांच्या प्रमुख भूमिकेतील संगीत

# राज्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दादा दानवे यांच्या उपस्थितीत उद्या बीड जिल्हा शिवसेनेची महत्त्वाची बैठक

**शिवसेना जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते**

**महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्ष नेते तथा शिवसेनेचे मराठवाडा संपर्क नेते माननीय अंबादास जी दानवे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड येथे उद्या सकाळी ११ वाजता हॉटेल ग्रॅण्ड यशोदा या ठिकाणी शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी व शिवसेनेचे कार्यकर्ते शिवसैनिक यांची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.**

या बैठकी बाबतीत माननीय विरोधी पक्ष नेते अंबादास दादा दानवे, संपर्क नेते सुनीलजी प्रभु साहेब, शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा ताई अंधारे,शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामाजी जाधव साहेब यांच्या आदेशाने ही बैठक पार पडणार आहे.

या बैठकीसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्षनेते तथा शिवसेनेचे मराठवाडा संपर्क नेते अंबादास दादा दानवे साहेब हे मार्गदर्शन करणार आहेत त्यांच्यासोबत शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख तथा माजी मंत्री बदामरावजी आबा पंडित,शिवसेनेचे लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनील धांडे,



शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे या सर्वांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक होणार आहे..

तरी बीड जिल्ह्यातील शिवसेनेचे सर्व आजी-माजी पदाधिकारी अंगीकृत संघटनांचे



पदाधिकारी,शिवसेना महिला आघाडी,युवासेना,शेतकरी सेना,शिक्षक सेना,अल्पसंख्यांक सेना या सर्वांचे प्रमुख पदाधिकारी उपजिल्हाप्रमुख,जिल्हा संघटक सर्व तालुकाप्रमुख, शहरप्रमुख,उपतालुकाप्रमुख शाखाप्रमुख,बूथ प्रमुख,गणप्रमुख त्याचप्रमाणे सर्व शिवसैनिक यांनी सकाळी ठीक दहा वाजता हॉटेल ग्रॅण्ड यशोदा या ठिकाणी या महत्त्वाच्या बैठकीसाठी उपस्थित रहावे.

या बैठकीमध्ये पक्ष संघटना बांधणी व अन्य विषयांवर या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होणार आहे,तरी ही बैठक येणाऱ्या निवडणुकीच्या अनुषंगाने महत्त्वाची असून जिल्हाभरातील शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या बैठकीसाठी अगदी वेळेवर बैठक सुरू होणार असल्याने सकाळी ठीक दहा वाजता हॉटेल ग्रॅण्ड यशोदा या ठिकाणी उपस्थित रहावे असे आव्हान शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी केले आहे.



## शिरसाळ्याचा भूमिपुत्र आरोग्य सेवक जिल्हा परिषद बीड येथे निवड करण्यात आली आहे

शिरसाळा प्रतिनिधी बापू किरवले- शिरसाळा येथे गरीब कुटुंबातील होतकरू असलेला एक लहान कुटुंब मधून जन्मलेला राहुल रघुनाथ काळे यांनी आरोग्यसेवा पदी निवड झाली आहे तरी त्यांचे मोठे बंधू एडवोकेट सतीश  काळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा जो शिकल तोच टिकेल अशी वारंवारआमचे मोठे बंधू एडवोकेट सतीश काळे यांनी सांगितल्यामुळे मी शिक्षणावर भर देऊन मी आज आरोग्य सेवा पदी निवड झाली आहे शिरसाळा सर्कल मधून त्यांचा सत्कार करण्यात येत आहे आहे एडवोकेट सतीश काळे ग्रामपंचायत सदस्य संतोष जी पांडे साहेब रघुनाथ देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते

# गेवराई तहसील कार्यालयासमोर अतिक्रमणविरोधात मुस्लिम बांधवांचे उपोषण

## उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांचे लेखी आश्वासन; अतिक्रमणे हटविणार!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील तलवाडा येथील कब्रस्तानच्या जागेवर मुस्लीम समाजाच्याच काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. या संदर्भात गावातील लोकांनी हे अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी मंगळवारी मुस्लीम बांधवांनी कुटुंबीयांसह तहसील कार्यालयासमोर उपोषण केले. दरम्यान, उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी अतिक्रमणधारकांना नोटीस देऊन आठ दिवसांत अतिक्रमणे हटवली जातील, असे लेखी दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले. तालुक्यातील तलवाडा येथील गट



नंबर ५१० मधील कब्रस्तान तसेच दुसरे लहान मुलांचे कब्रस्तान आहे. त्या ठिकाणी मुस्लीम समाजातीलच काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. हे अतिक्रमण हटवावे, या मागणीसाठी तलवाड्यातील ग्रामस्थांनी प्रशासनाकडे वेळोवेळी तक्रारी केल्या आहेत. त्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना आदेश दिले होते. तहसीलदारांनी मंडळ अधिकारी व तलाठी पाठवून दोन्ही कब्रस्तानाच्या जागेच्या पंचनामा करण्याचे आदेश दिले होते. दि. १७ मे २०२२ रोजी मंडळ अधिकारी व तलाठ्यांनी प्रत्यक्ष जायमोक्यावर भेट देऊन पाहणी व पंचनामा करून गेवराई तहसीलदारांना अहवाल दाखल केलेला आहे. मात्र कब्रस्तानच्या जागेवर झालेले अतिक्रमण काढण्यास टाळाटाळ होत असल्याने ही अतिक्रमणे काढावीत या मागणीसाठी मंगळवारी तलवाड्यातील मुस्लिम बांधवांनी कुटुंबीयांसह तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले होते. दरम्यान उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

# साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न द्या यासाठी परभणी चौक येथे लहुजी विद्रोही सेनेचा रस्ता रोको

**माजलगाव / प्रतिनिधी**

**लहुजी विद्रोही सेना माजलगाव च्या वतीने दि.११/९/२०२४ रोजी वसंतराव नाईक चौक(परभणी फाटा) येथे लहुजी विद्रोही सेनेचे संस्थापक अध्यक्ष लहूश्री मा. भास्कर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली भव्य रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.**



महाराष्ट्रातील मांग व बहुजन समाजाचे व आंतरराष्ट्रीय स्तरावरील जागतिक साहित्य नायक जगविख्यात साहित्य सम्राट लोकशाहीर महामानव डॉ. अण्णाभाऊ साठे यांनी असंख्य दर्जाचे जागतिक साहित्य लिहिलेले आहे. रशिया देशातील मास्को या शहरांमध्ये डॉ. अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा(स्मारक) बांधण्यात आलेले आहे. लहुजी सेना महाराष्ट्र राज्याच्या वतीने व माजलगाव विधानसभा क्षेत्रातील मातंग समाज व बहुजन समाजाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात यावे, साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची विकिपीडिया सत्य इतिहासावर आधारित उच्च दर्जाची बनवण्यात यावी, अण्णाभाऊ साठे यांची जन्मभूमी कार्य भूमी असणाऱ्या सांगली जिल्ह्याला डॉ. अण्णाभाऊ साठे नगर असे नाव देण्यात यावे, तसेच मुंबई येथील गोल्ड मोहरमिल ही जागा अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी देण्यात यावी. या मागण्यांसाठी लहुजी विद्रोही सेना च्या वतीने आज दि.११/९/२०२४ रोजी दुपारी १२:००वा. माजलगाव येथील वसंतराव नाईक चौक परभणी फाटा येथे लहुजी विद्रोही सेनेचे संस्थापक अध्यक्ष लहूश्री भास्कर शिंदे यांच्या नेतृत्वात भव्य रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष रंजीत भाऊ कसबे माजलगाव तालुका अध्यक्ष अमोल दळवी सह लहुजी विद्रोही सेनेचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.



बीड शहरातील सौ जयश्री विलास विधाते यांच्या अष्टपुत्र या निवासस्थानी जिजाऊ-सावित्री च्या रूपाने ज्येष्ठ गौरींच ( महालक्ष्मी ) आगमन झाले असून आपल्या महाराष्ट्राच वैभव असलेली दुर्मिळ अशा शिवशाही ते पेशवाई आणि मोगलाई पर्यंतच्या पितळ तांब्याच्या संसारोपयोगी भांड्याच संकलन लक्षवेधी ठरत आहे

## शिवतेज गणेश मंडळाचे वतीने धारुर येथील जि प माध्यमीक शाळेत

# वृक्षारोपन व गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहीत्याचे वाटप करण्यात आले

किल्लेधारूर । प्रतिनिधी

धारूर शहरातील आशोक नगर भागातील शिवतेज गणैश मंडळ विवीध सामाजीक उपक्रम राबवून श्री गणेश उत्सव साजरा करत आहे येथील जि प माध्यमीक शाळैत माध्यमीक शाळेत विद्यार्थ्याना शालेय साहीत्य वितरण व शाळेच्या आवारात वृक्षारोपन करण्यात आले हे वृक्ष जपवणूक करण्याचा संकल्प मंडळाचे कार्यकर्त्यानी केला आहे.धारूर येथील आशोटनगर भागातील शिवतेज गणेश मंडळाचे वतीने विवीध सामाजीक उपक्रम राबवून श्री गणेश उत्सव साजरा केला जात आहे या मध्ये विवीध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे येथील जि प माध्यमीक शाळेत विद्यार्थ्याना शालेय साहीत्य वाटप व वृक्षारोपनाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले



होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक जी के आकुसकरं हे होते तर यावेळी पोलीस निरीक्षक डि बी वाघमोडे यांचे हस्ते सर्व करण्यात आले तर यावेळी प्रमुठ पाहुणे म्हणुण पत्रकार अनिल महाजन, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद सांवत, निलेश ढगे हे उपस्थीत होते. यावेळी सर्व विद्यार्थ्याना वह्या व पेन चे वाटप मान्यवराचे हस्ते करण्यात आले यावेळी पोलीस निरीक्षक डि बी वाघमोडे, पत्रकार अनिल महाजन अध्यक्षीय मार्गदर्शन मुख्याध्यापक जी के आकुसकर यानी विद्यार्थ्याना मार्गदर्शन केले. यानंतर शाळेच्या प्रागंणात उपस्थीत मान्यवराचे हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी सुत्रसंचलन शिक्षक रमेश रुद्रे यानी केलेयावेळी गणेश मंडळाचे अध्यक्ष कृष्णा सुरवसे उपाध्यक्ष विशाल जाधव सचिव संकेत माने कृष्णा चोले सार्थक सावंत गणेश जाधव संदीप मधुरकर गुड्डु सावंत सुदीप मधुरकर निलेश ढगे विकास तिडके प्रसाद सावंत गोपीनाथ यादव बबलु सावंत अविनाश सावंत रोहित परबळकर तर सर्व शिवतेज गणेश मंडळाचे सदस्यशाळेतील सर्व शिक्षकव विद्यार्थी उपस्थित होते

# लिंबागणेशच्या भालचंद्राची ११तास छबिना मिरवणूक मोठ्या उत्साहात संपन्न; :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील भालचंद्र गणेशाची छबिना मिरवणूकीस रविवारी रात्री १० वाजता सुरूवात झाली.दरवर्षी प्रमाणेच रात्रभर तब्बल ११ तास गावातुन पालखी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत रात्रभर गणपतीच्या स्वागताला धोतराच्या पायघड्या अंथरण्यात आल्या.सकाळी ९ वाजता गणपती मंदिरात मिरवणूक पोहचल्यानंतर सामुदायिक आरती करण्यात आली. गणेश भक्तांना महाप्रसादाचे वाटप करून सांगता झाली. भालचंद्र गणपती मंदिरात रविवारी रात्री १० वाजता गणपतीची उत्सवमूर्ती पालखीत सजवुन सामुदायिक आरती करण्यात आली.त्यानंतर पालखीतुन मिरवणुकीला सुरुवात झाली. गणेश मंदिराला प्रदक्षिणा घालून बाजारतळ मार्गे मुख्य रस्त्यावरून मिरवणूक रात्री १२ वाजता गावातील मारोती मंदिराच्या मुख्य चौकात पोहोचली.पालखीसमोर भजणी मंडळी, बॅण्ड पथक, लेझीम पथक सहभागी झाले होते.मोरया हो मोरया जय गजानन मोरया चा गजर करत गणेश भक्तांनी पालखीला खांदा दिला. मिरवणूक दरम्यान ग्रामस्थांनी आपल्या घरासमोर रांगोळ्या काढल्या होत्या.दारात पालखी आल्यानंतर पाट टाकुन खांदेकरी यांचे पाद्यपुजन करत,कपाळाला गंध लावून श्रीफळ फोडुन देवाला नैवेद्य दाखवून मनोभावे दर्शन घेतात. पालखी प्रदक्षिणा बाजारतळ,डवरवाडा, मारोती मंदिर, वाणी चौक, ढवळे चौक,सरकारवाडा, मारोती मंदिर, चांभार गल्ली, कैकाडी गल्ली,बाजारतळ मार्गे मिरवणूक सोमवारी सकाळी ९ वाजता गणपती मंदिरात पोहचल्यानंतर गणपतीची पालखी मंदिरात ठेऊन विश्रांती देण्यात आली.त्यानंतर महाआरती करून ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.छबिना मिरवणुकीत



मशालधारी,ध्वज,विणेकरी असे सेवेकरी सहभागी झाले होते. मोरयाचा गजर करत गणेश भक्त श्रीफळ फोडून पालखीला खांदा देऊन गणरायाचे स्वागत करत होते. पोलिस बंदोबस्त चोख असुन नेकनुर पोलिस स्टेशनचे प्रभारी पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी, उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे,पो.हे. राऊत,डोंगरे आदिंनी पालखीला खांदा देत पोलिस प्रशासनाच्या वतीने स्वागत केले. छबिना मिरवणूक लिंबागणेश पंचक्रोशीतील गणेशभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



**आज धारूर शहरातील गायकवाड गल्ली येथील शिवछत्रपती गणेश मित्र मंडळ व छत्रपती संभाजी नगर धारूर मधील जय हनुमान गणेश मित्र मंडळाच्या गणपतीची आरती शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी धारूर चे तालुका प्रमुख बाबासाहेब सराफ,माजी तालुका प्रमुख विनायकजी ढगे,शहर संघटक सुनील भांबरे, विनोद गुंड पाटील,दीपक घोडके पाटील,अजय गायकवाड,गणेश घटमळ, ज्ञानेश्वर किरदत, बालाजी घटमळ, सुनील खांडेकर, महेश भोजने सह मंडळाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते..!!**

# सहायक पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी ॲक्शन मोडवर,बेशिस्त वाहनधारकांना लावली शिस्त

**नेकनूर । प्रतिनिधी**

**नेकनूर येथे गेल्या काही दिवसांपासून वाहतूक कोंडी समस्या वाढत उग्र रूप धारण करीत आहे सण-समारंभ, मंत्री महोदयांचे मोर्चे-दौरे, यात अधिक भर घालतात. वाहतूक कोंडीमुळे प्रवास करण्यास बराच वेळ जातो, आर्थिक प्रगती मंदावते, रस्त्यावरील किरकोळ भांडणे वाढतात, वाहन चालकांची चिडचिड वाढते, वाहनांचे इंधन मोठ्या प्रमाणावर जळते. ज्यामुळे ध्वनी आणि वायू प्रदूषण वाढते.राष्ट्रीय महामार्गवर कसल्याही पद्धतीने गाड्या रोडवर लावून वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याचे सहायक पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांच्या निदर्शनास येताच तात्काळ पोलिस कर्मचारी बांगर यांना रस्त्यावरील वाहतूक कोंडी दूर करण्यास सांगितले. राष्ट्रीय महामार्गावरिल कोठे व कशाही पद्धतीने लावलेल्या ३५ वाहनावर कारवाई करून १७,००० ते १८००० पर्यंत ऑनलाईन दंड**



**वसूल केल्याचे पोलीस कर्मचार्यांनी यांनी सांगितले.**


आता सध्या गणपती, महालक्ष्मी, अशा प्रकारचे वेगवेगळे सण साजरे केले जात आहेत त्यामुळे राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक करणाऱ्याना नाहक त्रास सहन करावा लागत होता.कशाही पध्दतीने वाहने लावल्यामुळे अपघाताची ही शक्यता नाकारता येत नसल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांनी म्हटले आहे. यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरून आडव्या उभ्या पद्धतीने वाहन लावणाऱ्या वाहन चालकाला ऑनलाईन दंड तर दिलाच याचबरोबर शिस्त कशी असते हे ही जनतेला पोलिसांनी दाखवून दिले.रस्त्यावरील वाहतूक आता सुरळीत झाल्याने वाहतूक करणाऱ्यानी पोलिसांचे कौतुक केले आहे.

# आधार सेंटर आर्थिक लूट मंजुरीचे ठिकाण सोडुन घटला चालकांकडूनहे आधार सेंटर

## अंगणवाडीचे आधार सेंटर तात्काळ सुरु करा - शेख कलीम इनामदार

बीड । प्रतिनिधी

नागरीकांचे सुविधेसाठी असणारे आधारसेंटर मोठ्या प्रमाणावर आर्थिक लुट करीत असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे आधार सेंटर चालक मनमर्जीने ठिकाण बदलुन आधार सेंटर चालवित असल्याने नागरीकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. बीड तालुक्यातील अनेक अंगणवाडी या ठिकाणी आधार सेंटर मंजुर करण्यात आले आहे. परंतु आधार सेंटर वर नियुक्त करण्यात आलेले सुपरवायजर त्या ठिकाणी सेंटर न चालविता स्वतःचे दुकानात सेंटर चालविण्याचे काम करीत असल्याने नागरीकांना त्रास सहन करावा लात आहे. म्हणुन जिल्हाधिकारी, बीड यांनी बीड तालुक्यातील सर्व आधार सेंटरची तपासणी करुन मंजुर झालेल्या ठिकाणी आधार सेंटर चालविण्याचे आदेश पारीत करावे व अंगणवाडी या ठिकाणी सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत आधार सेंटर चालविणे बंधनकारक करावे अन्यथा जन आंदोलन करण्यात येईल असे पत्रक सामाजिक कार्यकर्ते शेख कलीम यांनी दिले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, मुलांचे आधारसाठी शासनाच्या वतीने कोणतीही फिस ठेवण्यात आली नाही. परंतु आधार सेंटर चालक नविन आधारकार्ड करीता २००/- रुपये घेऊन आर्थिक लुट करीत आहेत. तर अपडेट सोबतच नाव, पत्ता व मोबाईल नंबर दुरुस्त करता येतो. परंतु प्रत्येक बाबीसाठी वेगवेगळी फिस ते ही २००/- रुपये म्हणजे ८००/- रुपये घेण्याचे काम केले जात आहे. खरे पाहीले तर या सर्वांसाठी ५०/- रुपये फिस असताना आधार सेंटर चालक अडवणुक करुन नागरीकांची लुट करण्याचे काम करीत आहेत. बीड तालुक्यात गावाच्या ठिकाणी अंगणवाडी या ठिकाणावर आधार सेंटर मंजुर करण्यात आले आहे. परंतु या सेंटर वर नियुक्त करण्यात आलेले सुपर वायजर स्वतःच्या दुकानात ते सेंटर




चालविण्याचे काम करीत आहे, पिंपळवंडी व पाली या ठिकाणचे आधार सेंटर मंजुर असताना त्या ठिकाणी आधार सेंटर चालविले जात नाही. सदरील ठिकाणचे आधार सुपरवायझर शेख आरेफ यांना जवाब विचारला तर आमचे कोणी वाकडे करु शकत नाही कोठे जायचे जा एवढे पैसे द्यावेत लागतील आणि माझ्या दुकानात येऊनच काम करावे लागेल अशी भाषा वापर करुन नागरीकांना वेठेस धरण्याचे काम करीत आहेत. तर कॅम्प मोडचे किट वर असणारे सुपर वायझर मंजुरचे ठिकाणी सेंटर चालवित नाहीत. म्हणुन जिल्हाधिकारी, बीड यांनी सर्व आधार सेंटरची तपासणी करुन हलगर्जीपणा करणारे सेंटर बंद करुन नविन सेंटर मंजुर करावे. या बाबत यु.आय.डी. या एजन्सीकडे तक्रार सुध्दा करण्यात आली असल्याची माहिती

# मणिपुरात पुन्हा हिंसाचार

## तीन दिवसांत सात मृत्यू, पाच दिवस इंटरनेटबंदी, तीन जिल्ह्यांत संचारबंदी लागू

इम्फाळ : वांशिक हिंसाचारामुळे गेल्या १६ महिन्यांपासून धगधगत असलेल्या मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचाराची ठिणगी पडली आहे. राज्यात गेल्या तीन दिवसांत हिंसाचारात सात जणांचा मृत्यू झाला आहे. दुसरीकडे, पोलिस महासंचालक आणि राज्याच्या सुरक्षा सल्लागारांना हटवण्याच्या मागणीसाठी राजभवनावर मोर्चा काढण्याचा प्रयत्न करणारे आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये झालेल्या धुमश्चक्रीत मंगळवारी ४०हून अधिक विद्यार्थी जखमी झाले. या पार्श्वभूमीवर मणिपूर सरकारने संपूर्ण राज्यात इंटरनेट सेवा पाच दिवसांसाठी स्थगित केली, तर तीन जिल्ह्यांत संचारबंदी लागू केली.




मणिपूरमध्ये गेल्या आठवड्यात पुन्हा उफाळून आला. कांगपोकपी जिल्ह्यात दोन सशस्त्र गटांमध्ये रविवारी झालेल्या संघर्षात नेमजाखोल लहुंगडिम या महिलेचा मृत्यू झाल्याची माहिती मंगळवारी पोलिसांनी दिली. या संघर्षानंतर स्थानिकांनी जंगलात आसरा घेतला. दोन गटांच्या संघर्षादरम्यान मोठ्या प्रमाणात शक्तिशाली बॉम्बचा वापर करण्यात आला, अशी माहिती पोलिसांनी दिली. राज्याच्या विविध भागांत गेल्या तीन दिवसांत झालेल्या हिंसाचारात सात जणांचा मृत्यू झाला आहे.

राज्यातील कायदा व सुव्यवस्था पुन्हा बिघडल्याच्या पार्श्वभूमीवर हजारो विद्यार्थी आणि महिला आंदोलकांनी बी. टी. मार्गावर असलेल्या राजभवनावर मोर्चा नेण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांना सुरक्षा दलांनी काँग्रेस भवनाजवळ रोखले. आंदोलकांनी घोषणाबाजी करत सुरक्षा जवानांवर दगडफेक केली. यामुळे जमावाला पांगवण्यासाठी सुरक्षा दलांना अश्रुधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्याने दिली. मणिपूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनीही निषेध मोर्चा काढला आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रतिमेचे दहन केले. यानंतर त्यांनी राज्य सचिवालयाकडे कूच केली, पण त्यांना इम्फाळ पश्चिम जिल्ह्यात काकवा येथे रोखण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या तीव्र आंदोलनामुळे मणिपूर सरकारने संपूर्ण राज्यात इंटरनेट सेवा पाच दिवसांसाठी स्थगित करण्याचा निर्णय मंगळवारी घेतला. छायाचित्रे, द्वेषमूलक भाषणे आणि व्हिडीओ यांच्या प्रसारासाठी सोशल मीडियाच्या वापर केला जातो. त्यामुळे यावर निर्बंध आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला, असे राज्याच्या गृहविभागाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले.

# नांदगाव,नांदगाव तांड्यात ड्रोन कॅमेऱ्याच्या घिरट्या



छत्रपती संभाजीनगर(प्रतिनिधी)

घोसला गावसह नांदगाव नांदगाव तांडा या तीन गावांच्या परिसरात सोमवारी रात्री एक वाजेपासून ड्रोण कॅमेऱ्याने घिरट्या सुरू होत्या त्यामुळे या परिसरातील नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. नांदगाव, नांदगाव तांडा गावावर रात्री अकरा वाजता व घोसला गावावर रात्री एक वाजता ड्रोण कॅमेऱ्यानी घिरट्या घातल्याचे रात्री काही ग्रामस्थांनी पाहिले व परिसरात वाऱ्या सारखी बातमी पसरताच या तीन गावातील ग्रामस्थांनी अख्खी रात्र जागून काढली होती दरम्यान घोसला परिसर अज्ञात चोरट्यांनी मुख्य केंद्र केले आहे महिनाभरात या परिसरात घरफोड्या व शेती परिसरात चोऱ्या झालेल्या आहे दरम्यान सोमवारी रात्री ड्रोण च्या घिरट्या होताच या परिसराला लागून असलेल्या गोंदेगाव आणि वनगाव भागांतून तीन बैल अंदाजे किंमत दोन लाख रु चोरी झाल्या ची घटना मंगळवारी उघड झाली आहे याप्रकरणी बनोटी पोलीस दुरक्षेत्र येथे संबंधित शेतकऱ्यांनी तक्रार दिली आहे या चोरीमुळे परिसरात ड्रोण च्या घिरट्या व झालेली चोरी यामुळे खळबळ उडाली आहे.

# सोयगाव परिसरात वीस गावांना मुसळधार पावसाने शेतकऱ्यांची चिंता वाढविली

छत्रपती संभाजीनगर(प्रतिनिधी)

सोयगाव सह परिसरातील वीस गावांना मंगळवारी दुपारी तीन वाजता पुन्हा एक तास च्या वर मुसळधार पावसाने तडाखा दिला आहे त्यामुळे या वीस गावातील कपाशी,मका पिके दुपारनंतर गुडघ्यावर पाण्यात बुडाली होती दरम्यान निमखेडी, घोसला,उमर विहिरे या तीन गावांना पावसाने जोरदार फटका दिला आहे त्यामुळे या तीन गावात नुकसानीची तीव्रता अधिक असल्याचे पावसाच्या उघडीपी नंतर आढळून आले. सोमवारी सायंकाळी घोसला शिवारात झालेल्या ढगफुटी च्या पावसा नंतर मंगळवारी दुपारी तीन वाजता पुन्हा सोयगाव सह कंकराळा, माळेगाव,पिंपरी, जरंडी, निंबायती,रामपुरा तांडा,निंबायती गाव, न्हावीतांडा,बहुलखेडा कवली उमर विहिरे, तिखी, निमखेडी घोसला यासह वीस गावात मुसळधार पाऊस झाला दरम्यान निमखेडी, उमर विहिरे आणि घोसला या तीन गावांना तासभर ढगफुटी सदृश पाऊस झाला त्यामुळे सकाळी टवटवीत असलेली खरिपाच्या कपाशी मका ही पिके मात्र दुपारी गुडघ्यावर पाण्यात बुडाली होती त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे या आधीच मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानीच्या चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांची पुन्हा चिंता वाढविनारा पाऊस झाला आहे मात्र महसूल विभागाने या नुकसानीकडे दुर्लक्ष केले आहे.



सोयगाव परिसरात अतिवृष्टीची स्थिती असताना गेल्या तीन दिवसांपासून जरंडी, आमखेडा, सोयगाव घोसला या चारही सज्जा वर तलाठी गायब आहे जरंडी सज्जा चे तलाठी पद महिना भरापासन रिक्त आहे त्यामुळे आपत्ती निवारण साठी महसूलचा एकही कर्मचारी ग्रामीण भागात फिरकत नसून कृषी विभागाच्या कृषी सहायकांनी तर आमच्याकडे अतिरिक्त पदभार असल्याचे सांगून हातवर केले आहे त्यामुळे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची कैफियत कुणाकडे मांडावी असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.सोयगाव सह परिसरात अतिवृष्टी मुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचा तक्रारी प्राप्त होत आहे त्यासाठी पंचनामे करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणाना दिल्या असून तलाठ्यांना मुख्यालयी राहण्याचे आदेश काढन्यात आले आहे.

मनीषा मेने जोगदंडतहसीलदार सोयगाव.

# गणपती बाप्पा पुढच्या वर्षी खरंच लवकर येणार, ११ दिवस आधी ऑगस्ट महिन्यातच विराजमान होणार बाप्पा

देशभरात दरवर्षी गणेशोत्सवाची धूम पाहायला मिळते. नुकताच काल (८ सप्टेंबर २०२४) 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' अशी विनवणी करत दीड दिवसाच्या गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. पण, पुढील वर्षी बाप्पा खरोखरच लवकर येणार आहेत. २०२५ मध्ये गणरायाचं आगमन हे ११ दिवस आधी होणार आहे.

गणेश चतुर्थी २०२४ कधी?

पुढील वर्षी श्रीगणेश चतुर्थी २७ ऑगस्ट २०२५ रोजी येणार असल्याची माहिती पंचांगकर्ते दा. कृ. सोमण यांनी दिली. यावर्षी गौरी-गणपतीचं विसर्जन सहाव्या दिवशी होत आहे. पुढील वर्षी २ सप्टेंबर २०२५ रोजी गौरी-गणपतींचं विसर्जन होईल. पुढील वर्षी अनंत चतुर्दशी अकराव्या दिवशी, म्हणजे ६ सप्टेंबर २०२५ रोजी असेल. त्यामुळे पुढील वर्षी २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या काळात गणेशोत्सव साजरा करण्यात येणार आहे.

पुढील ११ वर्षांतील गणेश चतुर्थी

बुधवार, २७ ऑगस्ट २०२५ सोमवार, १४ सप्टेंबर २०२६ शनिवार, ४ सप्टेंबर २०२७ बुधवार, २३ ऑगस्ट २०२८ मंगळवार, ११ सप्टेंबर २०२९ रविवार, १ सप्टेंबर २०३० शनिवार, २० सप्टेंबर २०३१ बुधवार, ८ सप्टेंबर २०३२ रविवार, २८ ऑगस्ट २०३३ शनिवार, १६ सप्टेंबर २०३४ बुधवार, ५ सप्टेंबर २०३५

गणेश चतुर्थीला चंद्र का पाहू नये?

गणेशाचे आगमन होताना त्यावेळी चंद्रदर्शन करू नये असं धर्मशास्त्रात सांगितलं आहे. गणेश चतुर्थीला चंद्राचं दर्शन हे अशुभ मानलं जातं. त्यामागचं कारणही तसंच आहे.

रागाच्या भरात गणेशाने चंद्राला शाप दिला

पौराणिक कथेनुसार एके दिवशी भगवान गणेश आपले वाहन असलेले मुषक म्हणजे उंदरावर स्वार होऊन फिरायला गेले होते. त्यावेळी अचानक उंदीर अडखळला. ते पाहताच चंद्राला हसू अनावर झाले. चंद्राच्या या कृतीवर गणेश क्रोधित झाले आणि त्यांनी चंद्राला शाप दिला.


भाद्रपद महिन्यातील शुक्ल चतुर्थीच्या रात्री चंद्र पाहेल त्याच्यासमोर संकट उभं राहील. त्याच्यावर गणेशाची कृपा होणार नाही. तसेच त्याच्यावर खोटे आरोप केले जातील असा शाप गणेशाने दिला.

चतुर्थीला चंद्रदर्शन हे अशुभ

धार्मिक शास्त्रांच्या मान्यतेनुसार गणेश चतुर्थीच्या रात्री चंद्राचे दर्शन करून नये. त्या दिवशी जर तुम्ही चंद्र पाहिला तर तुमच्यावर खोटा आरोप ठेवला जाऊ शकतो किंवा तुमच्यासमोर एखादं संकट उभं राहू शकतं.

चुकून चंद्र दिसला तर काय करावं?

गणेश आगमनाच्या वेळी चुकून जर चंद्र दिसलाच, किंवा अनवधानाने त्याच्याकडे आपण पाहिलंच तर घाबरून जायचं कारण नाही. त्यावरही उपाय सांगितला आहे. चुकून जर चंद्र पाहिला तर भक्ताने गणेशाचे नमन करावं. त्या दिवशी गणपतीच्या मंत्राचा जप करावा किंवा गणेश अथर्वशीर्ष पठण करावं.




# मांजरा धरण भरण्याची शक्यता नदी काठच्या गावांना दक्षतेचा इशारा द्यावा

## कार्यकारी अभियंत्यांनी काढले चार जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

केज /प्रतिनिधी

धनेगाव ता. केज येथील मांजरा धरण हे मंगळवारी सायंकाळी ६ वाजेच्या दरम्यान ७६.५० टक्के भरले आहे. जर पाऊस पडत राहिला तर धरण केंव्हा ही भरू शकते. त्यामुळे अतिरिक्त होणाऱ्या पाण्याचा मांजरा नदी पात्रात विसर्ग करावा लागणार असल्याने नदी काठच्या गावांना आपल्या स्तरावरून अति दक्षतेचा इशारा द्या. असे पत्र लातूरच्या पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी लातूर, धाराशिव, बीड, बिदर (कर्नाटक) या चार जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना काढले आहे.धनेगाव येथील २२४.०९३ दलघमी साठवण क्षमतेच्या मांजरा धरणातून लातूर शहर, लातूर एमआयडीसी, अंबाजोगाई, केज, धारूर, कळंब या शहरासह येडेश्वरी साखर कारखाना, विखे पाटील साखर कारखाना आणि ६१ गावांना पाणी पुरवठा केला जातो. तर ६३ गावांना सिंचनाचा लाभ होतो. १५ ऑगस्टपर्यंत धरणात केवळ ३ टक्के पाणी साठा होता. मात्र त्यानंतर पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस होत गेल्याने २६ दिवसात धरण हे ३ टक्क्यावरून ७६.५० टक्क्यांपर्यंत भरले आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासह आता सिंचनाचा प्रश्न सुटला आहे. त्यामुळे धरणावर अवलंबून असलेल्या शहरासह ६१ गावातील नागरिकांसह ६३ गावाच्या शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, धरणाची पाणी पातळी ही ६४१.३५ मीटर झाली असून आता केवळ १ मीटर ओव्हरफ्लो होण्यासाठी शिल्लक आहे. तर धरणात १८२.५०४ दलघमी इतका पाणी साठा झाला आहे. धरण हे ७६.५० टक्के भरल्याने आता असाच पाऊस पडत राहिला तर धरण केंव्हा ही भरण्याची शक्यता आहे. त्यामुळे मांजरा धरणाचे प्रशासन सतर्क झाले असून धरण केंव्हा ही भरण्याची शक्यता असल्याने अतिरिक्त होणाऱ्या पाण्याचा विसर्ग मांजरा नदी पात्रात करावा लागणार आहे. त्यामुळे नदी काठच्या गावातील लोकांनी सतर्क राहणे महत्वाचे असल्याने नदी काठच्या गावांना आपल्या स्तरावरून अति दक्षतेचा इशारा द्या. असे पत्र लातूरच्या पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता अ. न. पाटील यांनी लातूर, धाराशिव, बीड, बिदर (कर्नाटक) या चार जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना काढले आहे. त्यामुळे आता धरण भरण्याकडे लक्ष लागले आहे.

## ज्येष्ठागौरींच्या आगमनानिमित्त्याने घरोघरी उत्साहाचे वातावरण,आज गौरी पूजन सोहळा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

महाराष्ट्राच्या धार्मिक इतिहासात परंपरेने श्रेष्ठ असलेल्या जेष्ठा गौरी सणाच्या अनुषंगाने ज्येष्ठागौरींचे आगमन मोठ्या उत्साहात झाले पुजनाचा सोहळा घरोघरी होत आहे. नेहमी प्रमाणे बाजारात ज्येष्ठागौरींच्या पुजनासाठी विविध साहित्य घेण्याकरिता महिलांची मोठी गर्दी होती. गौरींना सजविण्यासाठी अनेक प्रकारचे दागिने, विविध आकाराच्या मुर्त्या खरेदी केल्या परंपरेनुसार धातुची किंवा मातीची प्रतिमा ठेवून गौरींचे पुजन घरोघरी केले जाते. त्यास आकर्षक बसवून सजवतात. सुवासिक फुलांच्या माळा वनस्पतींची रोपे एकत्र बांधुन सजावट तसेच रूढी प्रमाणे मुर्तीला साडी नेसवून अनेक प्रकारच्या अलंकाराने सजवले जाते. खाद्य पदार्थ ठेवले जातात हे सर्व कार्यक्रम शुभ मुहूर्तावर होतात गौरीला थाटात आणले जाते नंतर आसनावर विराजमान करतात. काही ठिकाणी या सणानिमित्ताने महिला उत्साहाने पारंपारिक खेळ खेळून आनंद साजरा करतात. तीन दिवसांच्या पाहुण्या आलेल्या ज्येष्ठागौरीला पुरणाचा नैवैद्य



दाखविला जातो. विशिष्ठ प्रकारचे पदार्थ खाऊ घालण्याची पद्धत आहे.माहेरवाशिण ज्येष्ठा गौरीला १६ भाज्या,१६ कोशिंबिरी, १६ चटण्या, १६ पक्वान्ने, फराळाचे पदार्थ बनवितात. पुरणांच्या १६ दिव्यांनी आरती करतात. गौरी विसर्जनाच्या निमित्ताने विधीवत पुजन,हळदीकुंकू सोहळा करून घरांचे अंगण गजबजून टाकणार्या गौर्यांचे विसर्जन केले जाते.

## ग्रामपंचायत कार्यालय हिंगणगाव येथे एक दिवशीय आर्थिकसाक्षरता मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

कळंब/प्रतिनिधी

कळंब तालुक्यातील हिंगणगाव येथे एक दिवशीय वित्तीय साक्षरता कार्यक्रम संपन्न भारत सरकारच्या राष्ट्रीय व्यक्ती शिक्षा केंद्र (एन. सी. एफ. ई.) च्या माध्यमातून एक दिवशीय आर्थिकसाक्षरता मार्गदर्शन कार्यक्रम ग्रामपंचायत हिंगणगाव येथे दि.०८ सप्टेंबर २०२४ रोजी पुरुषांना ग्रामपंचायतच्या माध्यमातून व महिलांना बचत गटाच्या माध्यमातून वेगवेगळ्या पद्धतीने आयोजित करण्यात आला. या एक दिवशीय शिबीरामध्ये आर्थिक साक्षरतेचे महत्व समजावुन सांगण्यातआले सर्वसाधारणपणे ग्रामीण भागातील जनतेमध्ये वित्तीयसाक्षरते चा अभाव दिसुन येतो, या अभावामुळे बऱ्याच वेळेस केंद्र सरकारच्या, महाराष्ट्र सरकारच्या आलेल्या विविध योजना तसेच पोस्ट ऑफिस,राष्ट्रीयकृत बँकेमधील असलेल्या विविध योजना सामान्य जनतेपर्यंत पोंहोचत नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेमध्ये वित्तीय साक्षरतेचे प्रमाण कमी आढळून आले आहे. देशातील प्रत्येक नागरिकां मध्ये वित्तीय साक्षरता अधिक प्रमाणात निर्माण होऊन




प्रत्येकाने एक श्रीमंत आणि समृद्ध असे नागरी जीवन जगावे तसेच फसव्यायोजनांमध्ये आपला अनमोल असा घामाचा,कष्टाचा,पैसा गुंतवून बऱ्याच प्रमाणात पॉन्जी स्कीम (अर्थात फसवणूक करणाऱ्या) योजनांच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक केली जाते ही फसगत टाळावी यासाठी भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड (सेबी ) व राष्ट्रीय वित्तीय शिक्षा केंद्र ( एन. सी. एफ. ई.) चे वित्तीय प्रशिक्षक (फायनान्शिअल ट्रेनर) श्री.गणेश चौधरी यांनी मार्गदर्शन केले.

शासनाच्या विविध योजनांवर त्यांनी हिंगणगाव येथे ग्रामपंचायत कार्यालयाच्या माध्यमातून ग्रामस्थांना पोस्ट ऑफिस तसेच राष्ट्रीयकृत बँकेमध्ये असलेल्या बचतीच्या, विम्याच्या,पेन्शनच्या असलेल्या विविध योजना व त्यांचे फायदे ग्रामस्थांना समजावून सांगितले व या योजनांच्या माध्यमातून आर्थिक प्रगती व आर्थिक व्यवस्थापन कसे चांगल्या पद्धतीने होऊ शकते याचे मार्गदर्शन केले तसेच म्युच्युअल फंड सारख्या सर्वाधिक व्याजदर देणाऱ्या योजनेचे देखील मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर आयुष्यमान भारत सारख्या आरोग्य विषयक योजनेचे देखील मार्गदर्शन केले व महिलांना बचत गटाचे महत्व विशद केले तसेच लखपती दीदी सारख्या आर्थिक उन्नतीच्या योजनांचे सखोल असे मार्गदर्शन केले.

यावेळी उपस्थितांच्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांना खबरदारीच्या सूचना ही देण्यात आल्या. ऑनलाइन फ्रॉड व फसव्या योजना कशा पद्धतीच्या असू शकतात? तसेच कमी वेळेमध्ये अधिक परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या पॉन्जी स्कीम्स कशा असू शकतात व त्या पासून कसे सावध राहायचे? याचे देखील मार्गदर्शन व खबरदारी घेण्याच्या सूचना करण्यात आल्या. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्या साठी सहकारी चांदणे जी.बी. हिंगणगावच्या सरपंच सौ सुरेखाताई लोंढे, उपसरपंच, बचत गटाच्या सीआरपी उषाताई वाघमारे व इतर ग्रामपंचायत सदस्य यांनी परिश्रम घेतले तसेच या शिबीराला ग्रामस्थ व बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. शेवटी आभार संजय लोंढे व उषाताई वाघमारे यांनी मानले.

# पीक नुकसान पाहणीसाठी पैशाची मागणी

## विमा कंपनी प्रतिनिधीकडून निर्लज्जपणाचा कळस

परळी / प्रतिनिधी

परळी तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीत झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आलेल्या विमा प्रतिनिधींकडून शेतकऱ्यांकडे थेट पैशाची मागणी केली जात आहे. त्यामुळे अगोदरच आर्थिक अडचणीत आलेला शेतकऱ्यांना पीक पंचनाम्यासाठी पैश्याची मागणी होऊ लागल्याने मेलेल्या टाळू वरचे लोणी खाण्याचा प्रकारच घडत असल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. पैशाची मागणी कोणी करत असेल तर तक्रार करा असे आवाहन कंपनीकडून करण्यात आले तरी शे-दोनशे चे लाजीमदार असलेले प्रतिनिधी पैसे घेतल्याशिवाय पंचनामा करत नसल्याच्या तक्रारी शेतकरी करत आहेत.

परळी शहर व तालुक्यात अतिवृष्टी आणि मुसळधार पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या हातात तोंडाशी आलेल्या पिकाची मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे. सोयाबीन,तूर, कापूस यासारख्या पिकासह फळबागा देखील जमीनदोस्त झाली आहेत.असे असताना शासनाने ऑनलाइन तक्रारी करण्यात बाबत शेतकऱ्यांना सूचना केली होती. त्याप्रमाणे शेतकऱ्यांनी ऑनलाइन तक्रारी केल्या आहेत. या तक्रारीची शहानिशा करण्यासाठी पीक विमा कंपनीने आपले प्रतिनिधी गावोगावी पाठवले आहेत. शहानिशा करण्यासाठी गावांमध्ये गेलेले हे प्रतिनिधी एकाच ठिकाणी बसून शेतकऱ्यांना बोलवून घेत असल्याचे चित्र दिसत आहे. शेतकऱ्यांना विचारूनच कागदपत्रे पंचनामा करून संबंधित शेतकऱ्यांना थेट गटवाईज पैशाची मागणी करीत असल्याची तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या आहेत.

पावसामुळे पीक गेल्याने शेतकरी अगोदरच अडचणीत आला आहे. खर्च केलेला निघण्याची शक्यता कमी असतानाच नुकसान भरपाई मिळावी म्हणुन फॉर्म भरण्यासाठीच संबंधित कंपनीच्या प्रतिनिधीकडून पैशाची मागणी केली जात आहे. विशेष म्हणजे पैसे दिले नाहीत तर तुम्हाला नुकसान भरपाई मिळणार नाही अशी तंबी संबंधितांकडून दिली जात असल्याने शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज काढून या प्रतिनिधींना पैसे द्यावे लागत आहेत. हे प्रतिनिधी शेतकऱ्यांकडून गटवाईज पैसे घेत असल्यामुळे शेतकरी पुन्हा एकदा आर्थिक अडचणीत सापडला आहे. याबाबत कृषी विभागाकडे तक्रार करूनही काहीच उपयोग होत नसल्याचे अनेक शेतकऱ्यांनी सांगितले.

पीक विमा कंपनीला शेतकऱ्यांकडून फॉर्म भरून घेण्यासाठी रक्कम दिली जात असतानाही पुन्हा शेतकऱ्यांकडे पैसे मागण्याची करत मेलेल्या टाळू वरचे लोणी खाण्याचा किळसवाणा आणि निर्लज्ज प्रकार घडत असून या गंभीर बाबीकडे कृषी मंत्री तथा पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांनी लक्ष घालावे अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

परळी शहर आणि तालुक्यात मागील ७ दिवसात नापिकी आणि कर्ज बाजारीपणामुळे तीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.एकीकडे शेतकरी आत्महत्या आणि दुसऱ्या बाजूला विमा कंपनीच्या प्रतिनिधी कडून नुकसानीच्या पंचनाम्यासाठी होणारी पैशाची मागणी हा प्रकार अत्यंत लाजिरवाना आणि किळस आणणारा आहे.

नुकसानीची पंचनामा करत असताना शेतकऱ्यांनी कोणतेही शुल्क देऊ नये नुकसान पंचनामा पाहणी ही पुर्णपणे नि:शुल्क असून शेतातील नुकसानीची पंचनामा करण्याकरिता कोणीही अतिरिक्त शुल्काची मागणी केल्यास तक्रार करावी असे विमा कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून आवाहन केले आहे .

## आठ दिवसात केजच्या महामार्गावरील पथदिवे सुरू करा केज विकास संघर्ष समितीची मागणी

केज/प्रतिनिधी

केज शहरातील महामार्गा वरील पथदिवे गेली चार वर्षांपासून रस्ता बांधकाम कारणाखाली बंद आहेत. यामुळे रात्री उशिरा व सकाळी लवकर या मार्गा वरून प्रवास करणाऱ्या प्रवाशी व स्थानिक नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. अपघात व इतर प्रकार ही घडत आहेत.या महामार्गा वरील पथदिवे तात्काळ सुरू करा या मागणीसाठी समिती संबंधित यंत्रणेकडे सतत पाठपुरावा करत आहे.अगोदर रस्ता काम करणाऱ्या कंपण्या व आता केज नगरपंचायत या कामात विलंब करत आहे.

गेली दोन वर्षांपासून वेगवेगळ्या तारखा व आश्वासने दिली गेली आहेत.सध्या गणेशोत्सव सुरु आहे.संदलचे आयोजनही होत आहे. तरी केज नगरपंचायत ने केज शहरातील बीड - अंबाजोगाई महामार्ग, धारूर रोड महामार्ग व कळंब रोडचे बंद असणारे पथदिवे येत्या आठ दिवसात सुरु करावेत. तसेच




शहरातील इतर रस्त्यांची अत्यंत संथगतीने सुरू असलेली कामे तात्काळ पूर्ण करावीत व लोकनेते गोपीनाथराव मुंडे नाट्यगृहाचे काम उत्कृष्ट दर्जासह वेळेत पूर्ण करावे नसता येत्या १६ सप्टेंबर रोजी सकाळी ११-०० वाजल्या पासून वरील मागण्यासाठी केज नगर पंचायत समोर बेमुदत आमरण उपोषण सुरू करणार असल्याचे समितीच्या वतीने समन्वयक हनुमंत भोसले यांनी कळविले आहे.या बाबत केज विकास संघर्ष समितीने वरील सर्व मागण्यासाठी सतत पाठपुरावा केला आहे. वास्तविक पाहता हा विषय आंदोलने किंवा निवेदनाचा नाही.नगर पंचायत प्रशासनाने नागरिकांच्या अत्यावश्यक व मुलभूत सुविधांचा विचार करून तात्काळ या समस्या स्वतः सोडवायला हव्या आहेत.मात्र या अत्यावश्यक व गंभीर समस्येकडे केज नगर पंचायत व तालुका प्रशासन जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याची जनतेची भावना बनली आहे.म्हणून नागरिकांना शेवटचा पर्याय म्हणून आंदोलनासाठी रस्त्यावर यावे लागत आहे.यासाठी येत्या आठ दिवसात वरील समस्या नगरपंचायत व तालुका प्रशासनाने न सोडवल्यास येत्या १६ सप्टेंबर रोजी सकाळी ११-०० वाजता समिती बेमुदत आमरण उपोषण सुरू करत आहे



पाटोदा -आज श्री.वामनभाऊ ट्रेडर्स येथील श्री.ची आरती करण्याचा योग.यावेळी सोमीनाथ कोल्हे,मालक उद्योजक सुदर्शन चव्हाण दाजी,पत्रकार पोपट कोल्हे,पत्रकार अजिज शेख,पत्रकार राहुल सोनवणे, पत्रकार महेशर शेख,उमेश मुंढे,महेश देवा पांडव.

## वक्रतुंड गणेश मंडळाचे रक्तदान शिबीर संपन्न १८ रक्तदात्यांनी केले रक्तदान

केज/प्रतिनिधी

वक्रतुंड गणेश मंडळाचे १६ वे रक्तदान शिबीर संपन्न झाले यावेळी केज उपजिल्हा रुग्णालयाची टीम उपस्थित होती.वक्रतुंड गणेश मंडळ हे मागील १५वर्षे सामाजिक आध्यत्मिक,वैज्ञानिक परंपरा जपत आलेली आहे.वक्रतुंड गणेश मंडळाचे १६ वे वर्ष आहे. याही वर्षी आपली परंपरा जपून तुलसी रामायण कथा चालू आहे दररोज दोन ते पाच रामकथा सोबत इतरही कार्यक्रम चालू असतात याचाच भाग म्हणून दि.१० सप्टेंबर मंगळवार रोजी सकाळी १० ते १ यावेळी रक्तदान शिबीर घेण्यात आले.यावेळी केज उप




जिल्हा रुग्णालयाचे नागरगोजे श्रीकिशन यांची रक्त संकलन टीमउपस्थित होती.यावेळी १८ रक्त दात्यांनी रक्तदान केले तर पहिल्यांदा रक्तदानकरणारे पाच नवीन तरुणांनी रक्तदान केले धनंजय कुलकर्णी,अभिजितअंधारे,शुभम अंधारे,अथर्व कुलकर्णी,वैभव काळदाते सागर चाळक,मस्के हेमंत, नवनाथ जाधव,शिवमबडे, शंकर कसबे,संजयकोरडे, सुमित पन्नमवार,प्रसाद वैरागे,सुमित राऊत,राहुल एखंडे,काशिनाथ गोरे, सोहम राऊत,सचिनकवळे या रक्तदात्यानी रक्तदान केले.पहिल्यांदा रक्तदान करणारे अथर्व कुलकर्णी, वैभव काळदाते,सोहम राऊत,सुमित राऊत, काशिनाथ गोरे यांनी प्रथमच रक्तदान केले. यावेळी रक्त संकलन साठी आलेली टीम डॉ. ओंकार भालेराव,डॉ. तन्मयी वैद्य,डॉ.रिया बागडे,संतोष गायकवाड, नितीन सोळंके,सतीश गायकवाड व श्रीकिशन नागरगोजे उपस्थित होते. वक्रतुंड गणेश मंडळाच्या वतीने सर्व टीमचे आभार मानले.

## माजलगावात आमदार प्रकाश सोळंके यांचा सर्व पक्षीय समितीच्या वतीने भव्य सत्काराचे आयोजन

### सत्कार समितीच्या अध्यक्षपदी सुरेंद्र रेदासणी तर सचिव पदी अच्युत लाटे, मनोहर डाके, उमेश मोगरेकर

माजलगाव ।प्रतिनिधी

राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा यांच्या वतीने महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांच्या हस्ते माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांना उत्कृष्ट भाषणाबद्दल पुरस्कार देण्यात आला आहे. त्यानिमित्त माजलगाव मतदार संघातील सर्वपक्षीय नागरिकांच्या वतीने भव्य असा सत्कार सोहळा करण्याचे आयोजिले आहे. त्यासाठी काल मंगळवारी दिनांक १० सप्टेंबर रोजी माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात सर्व पक्ष व संघटनांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत या नागरी सत्कार समारंभा निमित्त सर्वपक्षीय सत्कार समितीचे गठन करण्यात आले. या समितीचे अध्यक्ष म्हणून



व्यापारी महासंघाचे तालुकाध्यक्ष सुरेंद्र रेदासणी यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच सत्कार समितीचे सचिव म्हणून अच्युत लाटे, मनोहर डाके, उमेश मोगरेकर, सहसचिव पदी रवींद्र कानडे, उमेश जेथलिया, नवनाथ धाईजे, कोषाध्यक्षपदी सुनील रुद्रवार, मार्गदर्शक म्हणून जयदत्त नरवडे, श्रीहरी मोरे व संभाजी शेजुळ यांची निवड करण्यात आली. तर दयानंद स्वामी, अरुण राऊत, मुसदिक बाबा, नारायण होके, तुकाराम येवले, कुणाल दुगड, अभय होके, राजेश घोडे, नासेरखान पठाण, महावीर मस्के, डॉ.वसीम मनसबदार, ड.अमित नाटकर, पप्पू धरपडे, संतोष यादव, शेषेराव जगताप, कचरू खळगे, पांडुरंग चांडक, प्रभाकर शेटे, ज्ञानेश्वर मेंडके, राजेश मेंडके, प्राचार्य सानप सर, संतोष जेथलिया, चंद्रकांत शेजुळ, पत्रकार दिलीप झगडे, पत्रकार परमेश्वर सोळंके, पत्रकार अमर साळवे, बन्सी मुंडे, सतीष रांजवन, दत्ता कांबळे, डॉ.यशवंत राजेभोसले, राकेश साळवे, भास्कर शिंदे, लालासाहेब तिडके, सिद्धार्थ ससाने यांची समितीच्या सदस्य पदी निवड करण्यात आली. अशा या भव्य सर्वपक्षीय नागरी सत्कार कार्यक्रमाचे आयोजन लवकरात लवकर करण्यात येणार असल्याचे यावेळी सत्कार समितीचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी व सचिव अच्युत लाटे यांनी सांगितले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT